DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

( उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. मा. सचिव, गृह विभाग, भारत सरकार यांचे आदेश No. 40-3/2020-DM-I (A) दि. 29.04.2020.
5. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR. 92/DisM-1 दि. 30.04.2020.
6. मा. सचिव, गृह विभाग, भारत सरकार यांचे आदेश No. 40-3/2020-DM-I (A) दि. 5 मे 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 11/05/2020.

## आदेश

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 चे आदेशान्वये लॉकडाऊनमुळे देशात विविध राज्यात अडकून पडलेल्या नागरिकांना आपापल्या राज्यात परत जाण्यासाठी तसेच संदर्भ क्र. 5 चे आदेशान्वये लॉकडाऊनमुळे राज्यातील विविध जिल्ह्यांत अडकून पडलेल्या नागरिकांना आपापल्या जिल्ह्यांत परत जाण्यासाठी आणि संदर्भ क्र. 6 अन्वये लॉकडाऊनमुळे परदेशांत अडकून पडलेले भारतीय नागरीक यांना भारतात येण्यासाठी संदर्भ क्र. 4, 5 व 6 मध्ये नमूद केलेल्या प्रमाणित कार्यपद्धतीनुसार (SOP) परवानगी देण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्याचे रहिवाशी असणारे जे नागरिक इतर राज्यांत, राज्यातील इतर जिल्ह्यांत व परदेशात अडकून पडले आहेत ते नागरिक उस्मानाबाद जिल्ह्यात परत येत असल्याने करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून या परत आलेल्या नागरिकांची तसेच कोरोनाबाबत जिल्ह्यातील संशयित व्यक्तींची प्रमाणित कार्यपद्धतीनुसार (SOP) वैद्यकीय तपासणी करुन त्यांना संस्थात्मक विलगीकरण (INSTITUTIONAL QUARANTINE) व घरी अलगीकरण (HOME QUARANTINE) करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4, 5 व 6 मध्ये नमूद केलेल्या प्रमाणित कार्यपद्धतीनुसार (SOP) परदेशांतून, इतर राज्यांतून व इतर जिल्ह्यांतून उस्मानाबाद जिल्ह्यात येणा-या व्यक्तींची उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये आल्यानंतर वैद्यकीय तपासणी करुन त्यांना संस्थात्मक विलगीकरण (INSTITUTIONAL QUARANTINE) व घरी अलगीकरण (HOME QUARANTINE) करणेबाबत जो निर्णय घेण्यात येईल



Scanned by CamScanner

त्याचे पालन करणे अशा व्यक्तींवर बंधनकारक असल्यामुळे कोरोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून घरी अलगीकरण (HOME QUARANTINE) चे उल्लंघन करणा-या व्यक्तींविरोधात दंडात्मक व फौजदारी कार्यवाही करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद आपत्ती व्यवस्थापन कायदा व "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार, घरी अलगीकरण (HOME QUARANTINE) चे उल्लंघन करणा-या व्यक्तींविरोधात खालीलप्रमाणे दंडात्मक व फौजदारी कार्यवाही करणेबाबत आदेशित करीत आहे.

| अ. क्र. | गैरकृत्याचे स्वरुप | गैरकृत्य करताना आढळल्यास करावयाची दंडात्मक व फौजदारी कार्यवाही | कार्यवाही करणारा विभाग |
|---|---|---|---|
| 1. | घरी अलगीकरण (HOME QUARANTINE) चे उल्लंघन करणे. | 1. गुन्हा दाखल करणे.<br>2. ग्रामीण भागात रु. 100/- व शहरी भागात रु. 500/- दंड | 1. स्थानिक स्वराज्य संस्था (न.प./न.पं./ग्रा.पं.)<br>2. पोलीस विभाग |

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू राहील.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
3. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना माहितीस्तव.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
5. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
6. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
7. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
11. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

11/6/20

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner